उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नागपूर महानगरपालिका, नागपूर व उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर या कार्यालयांच्या अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते आणि आस्थापना खर्चाबाबत...

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र.विघयो-३७१९/प्र.क्र.४१/नवि-२७,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २५ जून, २०१९.

वाचा :- १. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.विघयो-३७१९/प्र.क्र.४१/नवि-२७, दि. २७.०५.२०१९
२. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. आस्था/प्रा.यो.कोल्हापूर-नांदेड/प्रशा-१/२८७३, दि.११.०६.२०१९.

पार्श्वभूमी :-

उपरोक्त वाचा मधील अ.क्र.१ येथील दि. २७.०५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये नांदेड, व कोल्हापूर, येथील प्रादेशिक योजना कार्यालये अनुक्रमे उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नागपूर महानगरपालिका, नागपूर व उपसंचालक, नगर रचना, विकास योजना,विशेष घटक,कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर येथे पदांसहीत स्थानांतरीत करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. सदर कार्यालयांतील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते तसेच आस्थापना खर्च वहन करण्याकरिता संचालक, नगररचना, पुणे यांनी दि.११.०६.२०१९ च्या पत्रान्वये पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

शासन निर्णय :-

उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष,घटक, नागपूर महानगरपालिका व उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक,कोल्हापूर महानगरपालिका या विकास योजना विशेष घटकांतील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते तसेच आस्थापना खर्च या आधी ज्या लेखाशीर्षाखाली करण्यात येत होता म्हणजेच **"मागणी क्रमांक : एफ-२-२२१७-नगर विकास विभाग, ८०-सर्वसाधारण, ०१- संचालन व प्रशासन (००)(०६) प्रादेशिक योजना तयार करणे (२२१७०१६३)(योजनेतर)(Non-Plan)"** या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा. आर्थिक वर्ष संपल्यानंतर खर्चाचा ताळमेळ घेऊन सदर खर्चाची प्रतिपूर्ती संचालक, नगर रचना, पुणे यांनी संबंधित महानगरपालिकेकडून प्राप्त करुन घ्यावी.

०२. संबंधित नागपूर व कोल्हापूर महानगरपालिका यांनी त्यांच्याशी संबंधित विकास योजना विशेष घटक यांच्या वेतन, भत्ते तसेच आस्थापना खर्च यावर संचालक, नगर रचना, पुणे यांचेमार्फत उपरोक्त लेखाशिर्षाखाली केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती संचालक, नगर रचना, पुणे यांच्या विनंतीनुसार संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करावी.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक **२०१९०६२५१५४३०२३३२५** असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2019.06.26 11:15:58 +05'30'

(विष्णू पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:-

१. मा.राज्यपाल महोदयांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव
३. मा.राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव
४. मा.प्रधान सचिव (नवि-१) यांचे स्वीय सहाय्यक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. मा.प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहाय्यक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त
७. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे (पाच प्रतीसह)
८. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर.
९. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
१०.आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
११.जिल्हाधिकारी, नागपूर/कोल्हापूर.
१२.सह सचिव तथा संचालक नगररचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३.उप सचिव, नवि-०४, नवि-०९, नवि-१२, नवि-१३, नवि-३०, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.सर्व विभागीय सहसंचालक, नगर रचना,---------------------------
१५.जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/कोल्हापूर.
१६.उपसंचालक, नगर रचना प्रादेशिक योजना, नांदेड
१७.उपसंचालक, नगर रचना प्रादेशिक योजना, कोल्हापूर
१८. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९.निवडनस्ती/नवि-२७.

****